Cosmos Multidisciplinary Research E-Journal    Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 4.94    ISSN No. 2456-1665

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार

**गौतम विक्रम भालेराव**
संशोधक विद्यार्थी
gvbhalerao@gmail.com

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तीमत्व अनेक आंतरराष्ट्रीय ख्यातीचे घटनातज्ञ, मानववंश शास्त्रज्ञ, कायदे तज्ञ, उत्कृष्ट संसदपटू, तर्कशुध्द मांडणी करणारे संपादक, धर्म आणि संस्कृतीचे चिकीत्सक अभ्यासक, जागतीक दर्जाचे अर्थतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, दिन दुबळाचे कैवारी, शेती व शेतकरी कामगारांचे हितकर्ते अशा विविध भूमिकामध्ये त्यांचे विचार अभ्यासलेले आहेत. त्यांच्या या विषयाबरोबरच शेती विषयक विचार समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

भारतातील लहान धारणाक्षेत्र आणि त्यावरील उपाय या 1918 साली जर्नल ऑफ इकोनॉमिक्सच्या खंड एक मध्ये प्रकाशीत झाला आहे. यात शेती विषयक समस्या व त्यावरील उपायावर प्रकाश टाकलेला आहे. नोबेल पारीतोषीक विजेते अर्थतज्ञ डॉ.अमर्त्यसेन आपल्या दि. 5 मे 2007 च्या व्याख्यानात म्हणतात. अर्थशास्त्रात आंबेडकर हा माझा बाप आहे. विशेषाधिकार नसलेल्यांच्या खरा नामांकीत कैवारी आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थतज्ञ म्हणून मांडलेल्या त्यांच्या शेती विषयक विचार समजून घेणे हा सदर शोधनिबंधाचा हेतू आहे.

## संशोधनाची उददीष्टे :–

1. भारतीय शेतीची पार्श्वभूमी अभ्यासणे
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जमीन महसुल आकारणी विषयक विचारांचे आकलन करने
3. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक विचारांचे आकलन करने.
4. सद्यस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शेती विषयक विचारांची उपयुक्तता पडताळने.
5. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीकोनातून शेतीचे उत्पन्न कमी असल्याची कारणे समजून घेणे.

## संशोधनाची गृहीतके :–

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते उत्पन्नावर जमिन महसूल आकारनी अन्यायकारक आहे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शेतीची उत्पादकता कमी आहे.
3. शेतीच्या उत्पादनात वाढ घडून आनून शेतक–यांचे जीवनमान आर्थिक, सामाजीकदृष्टया उंचावन्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका महत्वाची ठरते.
4. सदयस्थितीत भारतातील शेतीचे तुकडीकरण, कमी उत्पन्न या सारख्या समस्या पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेती विषयक विचारांचे महत्व लक्षात येते.

**भारतीय शेतीची पार्श्वभूमी**

भारतीय जनतेचा मुख्य व्यवसाय शेती राहलेला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा हा शेती मानला जातो. परंतू त्या शेती कसना–यावर नेहमीच अन्याय झालेला दिसुन आला आहे. क्लाईव्हच्या दूहेरी शासन पध्दतीने शेतवरील कराची वसुली जास्तीत जास्त बोली लावणा–याकडे शेतीचा –हास झालेला दिसतो. वारेन हेस्टींग्जने जमिन ही सरकारी मालकीची असुन जमिनदार यांची शेतीवरील मालकी धूडकावून लावली. कॉर्नवालीसच्या कायमधारा पध्दतीने वरच्या वर्गात श्रीमंतशाही व खालच्या वर्गात गुलामगीरीची वृत्ती निर्माण झाली. वंगाल्या आर्थिक उन्नतीला खिळ बसुन शेतकरी व सरकार यांच्यात मध्यस्थ अस्तित्वात आले. पूढेही दिवसेन दिवस शेतक–यांची पिळवनूकच झालयाचे दिसून आले आहे. दारीद्रयाने गांजलेल्या शेतक–यांचे शोषण अनेक मार्गाने होत होते. त्यापैकी 1929 मध्ये बाबासाहेबांनी खोती पध्दतीकडे आपले लक्ष वेधले. ''भारतीय बहिष्कृत समाज सेवक संघा'' च्या वतीने रत्नागिरी जिल्हा बहीस्कृत परिषदेच्या दूस–या अधिवेशनाला संबोधीत करतांना त्यांनी खोती पध्दतीत शेतक–यांना सोसाव्या लागना–या जाच व जुलूमाचा वाचा फोडली. खोताने ठरलेला शेतसारा वसुल करायला त्यातील ठरावीक रक्कम सरकारकडे जमा करावयाची व उरलेली रक्कम आपल्याकडे ठेवायची

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जमीन महसूल आकारनी व शेती विषयक विचार**

बाबासाहेबांच्या आयुष्यातली शेतक–यांचे दूसरे पर्व आहे. त्यांनी खोती विरूध्दच्या लढयाचे 1929 साली, आर्थिक विषमते विरूध्दचे कोकणातील शेती विरूध्दच्या लढयाचे रनशिंग फूंकले. भारतातील शेतीच्या मागासलेपनाचे कारण शोधणारा शोधनिबंध लिहिल्यानंतर बरोबर 11 वर्षांनी बाबासाहेबांनी शेती प्रश्न हातात घेतला. कोकणातील शेती पध्दती म्हणजे निव्वळ सरंजामशाही होती. शेतीत राबना–याने राब राब राबायचे व आणि खोतांनी त्यावरील मलीदा पळवायचा. कुळ केवळ दलितच होते असे नाही त्यात मराठे, कुनबी, ब्राम्हण, मुसलमान मराठे ब्राम्हण असलेले नेतेही बाबासाहेबांच्या खांदयाला खांदा लावून लढत होते. दलीत्तोरांसाठी आपण काही केले पाहिजे, किंबहूना सामाजीक विषमते सोबतच आर्थिक विषमतेचाही प्रश्न आपण धसास लावला पाहीजे असे त्यांन वाटत असे या आंदोलनात बाबासाहेब तिन्ही अंगासह प्राणपनाने उतरले होते. प्रत्यक्ष आंदोलनात कृती, वृत्तपत्रात लिखान, उनीपूरी दहा वर्षे या आंदोलनाला बाबासाहेबांनी दिली. खोतीचा प्रश्न धसास लावून खोती विरूध्द बिल असेंबलीत पास करूनच बाबासाहेब थांबले. 18 फेब्रुवारी 1927 ला सरकार नियूक्त सदस्य नियूक्त झाले तेंव्हा त्यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेत आपल्या पहील्याच भाषणात ठनकावून सांगीतले होते की, शेतक–याविषयी दूजा दूजाभाव ठेवणे योग्य नाही. ते म्हणतात,'' या बाबत कायदा त्या जनतेतच्या दृष्टीकोनातून पाहीले तरीही महसुल व्यवस्था आर्थिक विषमतेला खतपाणी घालनारी आहे.'' उदा. शेतसारा शेती मधून मिळणारे उत्पन्न नैसर्गिक अनूकुलतेने किंवा प्रतीकुलतेने भरघोस वाढू शकते किंवा कमी सुध्दा होवू शकते. प्रमानात मरावाच लागतो. यातून सर्व शेतक–यांना शेतसा–याचा एकच कर लागू झोला आहे. मग तो अल्पभूधारक असो किंवा जहागीरदार वा इनामदार असो. त्या उलट आयकर हा करदान्याच्या देय क्षमतेवर अतलंबून असतो. एखादया व्यक्तीला त्या त्या वर्षी उत्पन्न

कमी झाले असता त्यांना आयकर भरावे लागत नाही. शेतक—या बददल असा दूजा भाव ठेवने मला योग्य वाटत नाही.

प्रांतीक विधी मंडळात 'अल्पभुधारक दिलासा विधेयकावर'' चर्चा करतांना बाबासाहेब पून्हा एकदा शेती प्रश्नाच्या खोलात जातात. जानेवारी 1938 साली त्यांनी या विषयाच्या चर्चेत भाग घेतांना म्हटले होते '' भारत हा शेतीप्रधान देश आहे'' वर्षानूवर्षे इथली जमीन कसली गेली आहे. त्यामूळे येथील जमीनीची उत्पादकता व कस कमी झाला आहे. आपण प्रयत्न करूनही अमेरिकेतील वापरात नसलेल्या जमीनीची ऐवढी उत्पादकता भारतीय जमीन गाठू शकनार नाही. आणि त्यामुळे जमिनीची उत्पादक्ता वाढवण्याचा मार्ग जमिनीचे आकारमान वाढवणे हा नसुन आहे त्या जमीनीत मोठया प्रमाणात भांडवल मनूष्यबळ व तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पन्न वाढवणे हा आहे. याच भाषणात सहकारी शेतीचा सुचवलेला पर्याय महत्वाचा आहे. ते म्हणतात '' विखूरलेली जमीन ही शेतीतील मोठी अडचण आहेच व म्हणून जमीनीचे एकत्रीकरण व्हायला हवे. ते पूढे सांगतात शेतीचे आकारमान वाढवण्यासाठी मागे समाज घटक भूमिहीन होनार असेल तर हा मार्ग धोक्याचा आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत सहकारी शेती हा सर्वोत्कृष्ट उपाय वाटता. या मार्गाने जमीनीचे एकत्रीकरण होईल व जमीनीचे आकारमान वाढेल. जमीन मशागतीसाठी लागणारे किमान भांडवल, मनुष्यबळ, तंत्रज्ञानही परस्पर सहाय्याने उपलब्ध होवू शकेल. त्याच बरोबर कुणाच्या मालकी हक्कावरही गदा येणार नाही.

21 फेब्रुवारी 1939 रोजी मुंबई इलाखा कायदे मंडळाच्या अंदाजपत्रकावर भाष्य करतांना बाबासाहेब म्हणतात ''या प्रांताचे जमिन महसुलाचे उत्पन 3 कोटी 18 लाख 63 हजार रूपये आहे. गेल्यावर्षी कॉंग्रेस सरकाने 10 लाख रूपयाची सुट दिली होती. या वर्षी 40 लाखाची सुट देण्याचा विचार आहे. जर इतर कर बसवून सरकार सर्व जमीन महसुल माफ करत असेल तर अंदाज पत्रकावरील आपला विरोध आनंदाने मागे घेतो. जूलै 1938 मध्ये बाबासाहेब म्हणतात, करभरनीच्या माध्यमातून येता—या पैशाचा उपयोग शेतक—यांना कर्जमुक्ती करण्यासाठी केला पाहीजे जेणे करून ते गरिबी विरूध्द लढु शकतील आणि शिक्षण घेवू शकतील.

1925 च्या सुमारास शेती आणि शेतसारा या विषयी काही प्रश्न उपस्थित झाले होते. शेतसारा किती घ्यावा? त्याचा दर काय ठरवावा? यासाठी सरकारने ''लॅव्ड रेव्हेन्यू कमेटी'' नेमली होती. या कमीटीच्या निमीत्ताने शेतसारा कसा असावा या विषयी आपले विचार दै.केसरीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाठवले होते. चालू पध्दती नूसार शेतसारा हा दर एक जमीनीवर बसलेला आहे. त्यामूळे शेती उत्पन्न होवो अथवा न होवो शेतसारा हा भरावाच लागतो यात शेतकरी वर्ग पिळला जातो म्हणून या पध्दतीला डॉ. बाबासाहेबांनी विरोध दर्शवला. कर देणे हे प्रत्येक नागरीकांचे कर्तव्य असले तरी सर्वापासून सरसकट कर घेणे राष्ट्राच्या दृष्टीने हितावहाचे नाही. यासाठी कर घेण्याच्या पध्दतीत स्वरूप बदलण्याबाबत ते आग्रही होते. त्यांच्या मते, कराचे प्रमाण कर देणा—याच्या मदगूराप्रमाने असावे आणि मदगूर ठरवितांना धंदयाच्या उत्पन्नावरून तो न ठरवीता माणसाच्या ऐपतीवरून तो ठरवला जावा. असे झाल्याने चार महत्वाचे फायदे होईल.

1. शेतीचा कर शेतीच्या उत्पन्नावर न बसविता शेतक–याच्या ऐपतीवर बसवला जाईल.
2. कर न भरू शकणा–या शेतक–यांची कराच्या बोजा पासुन सुटका होईल.
3. जमीन महसुलाची वसूलीच्या दृष्टीने जमाबंद न राहता तीच्या जमेत एक प्रकारचा लवचिकपणा येईल.
4. कराचे चढते प्रमाण असल्याने गरीब व श्रीमंत शेतक–यात जो अन्याय होतो तो टळेल.

यामुळे जेवढी व्यक्तीच्या उत्पन्नाची आवक ऐपत त्यानूसार कराचे प्रमाण ठरले जिथे अधीक उत्पन्न तिथे अधिक कर आणि जितके कमी उत्पन्न तितका कमी कर आवक उत्पन्नाच्या चढत्या प्रमाणात कराचे स्वरूप ठेवल्याने वित्तीय तूट निर्माण न होता त्यात समतोल साधता येईल.

निष्कर्ष :–

लहान धारणक्षेत्र व त्याचे विखंडन ही कमी उत्पादकतेचे कारणे दिसुन आले आहेत. जमीन महसुल आकारणी ही अन्याय कारक ठरणारी आहे. बाबसाहेबांची कार्यक्षमता एवढी प्रगाढ आणि प्रगल्भ होती की त्यांनी एखादया विषयाला सहज जरी स्पर्श केला तरी त्यात बरेच नवीन करून ठेवलं आहे. भारतीय शेतीला दूरावस्थेतुन बाहेर काढायचे असेल तर शेतीला उदयोजकाचा दर्जा आणि पर्यायी उदयोगही निर्माण करण्याचा सल्ला बाबासाहेबांनी दिला आहे. सामुहीक शेतीचे प्रयोग फायदेशीर ठरलेल्या बातच्या आजही आपल्या वाचनात येतात. यातून बाबासाहेबांची शेती विषयाची आस्था दिसुन येते. बाबासाहेबांचे पंच्चाहत्तर वर्षापूर्वीचे विचार आजही भारतीय शेतीला तारूण नेउ शकतात. शेतक–यांना कर्जमुक्त करा अशा मागण्या आजही होतांना आपण पाहतो, तेंव्हा बाबासाहेबांचे विचार अजूनही किती वर्तमान आहेत हे आपल्या लक्षात येते. ''दलीतांचे कैवारी'' दलीतांचे उध्दारक या विशेषणांनी बंदीस्त करन्याचा प्रयत्न केला जातोत्र परंतू डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तीमत्व या सर्व बंदीस्तांना पार करून जाणारे आहे. मुळात बाबासाहेब हे विश्वविख्यात अर्थतज्ञ होते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात विचार मांडतांना बाबासाहेबांनी वेळोवेळी शेती आणि शेतकरी यांच्या सदंर्भात मुलगामी विचार मांडले आहेत आणि वेळप्रसंगी आंदोलनात्मक कृतीही केली आहे. खोती विरोधी लढयामुळे संबंध कोकणावर व इतर प्रांतापेक्षा कोकणची कशी भिन्नता निर्माण झाली याचा मागोवा घेता येतो. या लढयामुळेच कोकणाचे आजचे सामाजिक सौहार्दाचे स्वरूप, त्याची सामाजीक, राजकीय व वैचारीक घडण योग्य प्रकारे घडून आलेली दिसुन येते.

संदर्भ :–

1. नवयूगनिर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुख्य संपादक. प्रो.बि.ए. चोपडे
कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद
2. बोल महामानवाचे – नरेंद्र जाधव, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
3. डॉ.बाबासाहेब आंबेडकर– धनंजय किर पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई
4. आधूनिक भारताचा इतिहास – डॉ.बि.एल.ग्रोव्हर ॲण्ड डॉ.एन.के.बेल्हेकर.एस.चंद प्रकाशन